# <u>जाहिरात</u>

## महाराष्ट्र शासन

## वनविभाग

## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती

(जाहिरातीचे दिनांकास रिक्त असलेली व दि ३१ डिसेंबर २०१५ पर्यन्त रिक्त होणारे पदाकरीता जाहिरात)

जाहिरात क्रमांक कक्ष-८/आस्था/ससेवरभरती/ १९७४ / दिनांक १३ ऑगष्ट २०१४

(अर्ज फक्त ONLINE पध्दतीनेच स्विकारण्यात येतील)

अमरावती वनवृत्ताच्या आस्थापनेवरील **वनरक्षक या संवर्गातील सरळसेवेने** नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करित असलेल्या व वनविभागात भरतीसाठी ईच्छुक असलेल्या **उमेदवारांकडून दिनांक** १०/०९/२०१४ पर्यन्त Online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सुचना व भरावयाचे अर्ज Maharashtra Knowledge Corporation Limited (**MKCL**) **या संस्थेच्या** **forest.erecruitment.co.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात व आनुषंगीक सुचना काळजीपूर्वक वाचावी.

वनरक्षक संवर्गातील रिक्त पदसंख्या, या पदाकरिता विहित केलेली वेतनश्रेणी /शैक्षणिक अर्हता/वयोमर्यादा/शारीरिक पात्रता/ ईत्यादिचा तपशिल

पदनाम : <u>वनरक्षक</u>

१. पदाचा तपशील -

| सामाजीक आरक्षण | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | ईएसबीसी | एसबीसी-ए | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | ११ | १ | १ | ४ | १ | २ | ० | १८ | ३ | १ | १६ | ५८ |

वरील उल्लेखित पदांकरिता आरक्षणापैकी प्रवर्गनिहाय **समांतर आरक्षण** खालील प्रमाणे आहे.

| समांतर/प्रवर्ग आरक्षण | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | ईएसबी सी | एसबीसी -ए | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला | ३ | ० | ० | १ | ० | १ | ० | ५ | १ | ० | ५ | १६ |
| प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | २ | ० | ० | १ | ० | ० | ० | ३ | ० | ० | २ | ८ |
| अतिउच्च गुण वत्ताधारक खेळाडू | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| होमगार्ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| अंशकालीन | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| अधिसंख्य वनमजूर | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| सर्वसाधारण | २ | १ | १ | २ | १ | १ | ० | ३ | २ | १ | ९ | २३ |
| एकूण | ११ | १ | १ | ४ | १ | २ | ० | १८ | ३ | १ | १६ | ५८ |

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती

**विशेष टिप** - या जाहिरातीत उक्त नमूद केलेली पदसंख्या दिनांक ३१-१२-२०१५ पर्यन्त रिक्त होणा-या पदावर आधारीत असल्याने प्रत्यक्ष नियुक्ती उक्त दिनांकापर्यन्त रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. तसेच उक्त पदसंख्येत व आरक्षणाच्या प्रमाणात ही जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर या संदर्भात शासनाकडून निर्गमीत होणा-या निर्देशाच्या अधीन राहून बदल होऊ शकते.

२. वेतनश्रेणी :- (वेतन श्रेणी रु.५२०० - रु.२०२००, ग्रेड वेतन - रु.१८००)

३. **शैक्षणिक पात्रता :-** उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) गणित विषयासह किंवा विज्ञान व गणित या विषयासह उत्तीर्ण केलेली असेल.

३.१ शासन निर्णय क्र.आरटीए-१०८२-२३२७-सीआर-६३-१६-अ, दि.५ ऑक्टोबर, १९८९ नुसार एसएससी उत्तीर्ण आणि कमीत कमी सेवा १५ वर्ष सैन्य सेवा झालेल्या व ज्यांच्याजवळ सैन्यसेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे असे माजी सैनिक वनरक्षक पदासाठी पात्र ठरतील. याबाबत शासन पत्र क्रमांक एफएसटी ११/१३/प्र.क्रं. ६१८/फ-४/ दिनांक ६ मार्च २०१४ नुसार माजी सैनिकांसाठी वनरक्षक पदासाठी ईयत्ता १० चेच गुण विचारात घेण्यात येऊन निवड यादया तयार करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

३.२ शासनाव्दारे घोषित नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचीत जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्यात मृत्यू व जखमी झालेले असे वनखबरे व अशा वन कर्मचा-यांच्या मुलांनी माध्यमिक शालांत परीक्षा ईयत्ता १० वी उत्तिर्ण केली असल्यास ते वनरक्षक पदासाठी पात्र असतील.

टिप :- नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांचे संबंधात वरील प्रयोजनाकरीता शासकीय वैद्यकिय अधिकारी तसेच यथास्थितीत संबंधीत घटना क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकारी यांनी जारी केलेले प्रमाणपत्र विचारार्थ घेण्यात येतील.

४. वयोमर्यादा :- उमेदवार हा दिनांक १० सप्टेंबर १९८९ पूर्वी आणि १० सप्टेंबर १९९६ नंतर जन्मलेला नसावा.

४.१ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे.

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.
(दोन) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०-१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२० ऑगष्ट, २०१० अन्वये "माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील."
(तीन) पात्र खेळाडुच्या बाबत ५ वर्षापर्यंत
(चार) धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.
(पाच) वनविभागातील अधिसंख्य वनमजूरांना शासन शुध्दीपत्रक , महसूल व वनविभाग, क्रं. एलबी-१०९४/प्रक्र-२५२/फ-९/दिनांक ३१-७-२००३ नुसार वयोमर्यादेसंबंधी अट शिथिलक्षम.
(सहा) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक/पअक-१००९/प्रक्र.२००/२००९१६-अ

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती

दिनांक २७-१०-२००० अन्वये पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करणे व वयोमर्यादेत सवलत देणे बाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे वयोमर्यादेत सवलत देणे बाबत अट शिथिलक्षम राहील.

५. **शारीरिक पात्रता.**

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | १६३ | १५० |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापदंडानुसारनुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापदंडानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

| (अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम) | | |
|---|---|---|
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापदंडानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापदंडानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

वरिल नमुद ऊंची, वजन व छातीचे मोजमापाकरीता **शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.२४/८/२०११ मधील** शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-१९८१ मधील परिशिष्ट-३ मध्ये मध्ये विहीत केलली ऊंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही ऊंचिच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील.

(अ) दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

<u>दूरदृष्टी</u>

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| | (सुधारलेली दृष्टी) |
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती

जवळील दृष्टी

| अधिक चांगला डोळा (सुधारलेली दृष्टी) | वाईट डोळा |
|---|---|
| J.१ | J.११ |

**प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.**

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

(क) शासनाव्दारे घोषित नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचीत जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्यात मृत्यू व जखमी झालेले असे वनखबरे व अशा वन कर्मचा-यांच्या मुलांनी माध्यमिक शालांत परीक्षा ईयत्ता १० वी उत्तिर्ण केली असल्यास ते वनरक्षक पदासाठी पात्र असतील.

१) उंची :- पुरूष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी.
२) छाती :- मोजणी आवश्यक नाही.

(ड) **खेळाडू प्रवर्ग :-** विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पूर्ण करणा-या खेळाडूना, विहित उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

(इ) **वनकर्मचा-यांचे पाल्यांना शारीरिक अर्हतेत सवलत :-** सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

(ए) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारास २.५ से.मी.
(बी) छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता व १.५ से.मी.फुगवून.

६. **निवडीची पध्दत :-**

६.१ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ते शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा व विशेष सुट करीता विहीत मापदंड इत्यादीची पूर्तता करतात किंवा कसे, याची शहानिशा करण्यात येईल.

६.२ जे उमेदवार शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादेची अट, उक्त पदाकरीता पात्रता पूर्ण करीत असतील अश्याच उमेदवारांची शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल. पुरुष व महिला उमेदवारांकरीता सर्व प्रथम अनुक्रमे ५ कि.मी./३ कि.मी. ची धावण्याची चाचणी व पुढील टप्प्यात अनुक्रमे २५ कि.मी. व १६ कि.मी. चालण्याची चाचणीचा समावेश राहील. धावण्याची चाचणी कमाल ३० मिनिटात व चालण्याची चाचणी कमाल ४ तासात पूर्ण करणे आवश्यक राहील. या प्रयोजनार्थ उमेदवारांनी खालील प्रपत्रात शासकिय वैद्यकीय अधिकारी कडून शारीरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उक्त प्रमाणपत्र सादर न करणा-या उमेदवारांचा भरतीमधील पुढील प्रक्रीयेकरीता विचार केला जाणार नाही.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती

| |
|---|
| उमेदवारांचे छायचित्र |

## वनरक्षक भरती २०१४
## शारीरिकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री/श्रीमती -- - - - - - - - - - -- - - - - - - - - -- - - राहणार मु पो. - - - - - - - - - - - - -ता.- - - - - - - - - - - - जिल्हा - - - - - - - - -- - - हे अमरावती वनवृत्ताचे वनरक्षक भरती २०१४ मधील **धावण्याचे चाचणीकरीता** आवश्यक असलेले पुरुष ५ कि.मी. /महिला ३ कि.मी. ३० मिनिटात पूर्ण करणे व **शारीरीक क्षमता चाचणी** करीता आवश्यक पुरुष २५ कि.मी./ महिला १६ कि.मी. ४ तासामध्ये पूर्ण करणेस शारीरिकदृष्टया सुदृढ आहेत.

दिनांक :
ठिकाण

शासकिय वैद्यकिय अधिका-याचे नांव
पदनाम व शिक्का

*लागु नसलेला मजकूर खोडावा

६.३ धावण्याची चाचणी पुरुष उमेदवारांनी ५ किमी व महिला उमेदवारांनी ३ किमी जास्तीत जास्त ३० मिनीटामध्ये पूर्ण करणे आवश्यक राहील. उक्त धावण्याची चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल. धावण्याचे चाचणीमध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या ३ पट ऐवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहीत करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल. उक्त चाचणीत -

१. पहिल्या येणा-या ३ उमेदवारास (क्रमांक १ ते ३ वरील आलेले) यांना प्रत्येकी -१० गुण
२. त्यानंतर येणा-या ५ उमेदवारास (क्रमांक ४ ते ८ वरील आलेले) यांना प्रत्येकी -८ गुण
३. त्यानंतर येणा-या ७ उमेदवारास (क्रमांक ९ ते १५ वरील आलेले) यांना प्रत्येकी -६ गुण
४. त्यानंतर येणा-या १० उमेदवारास (क्रमांक १६ ते २५ वरील आलेले) यांना प्रत्येकी -४ गुण
५. त्यानंतर येणा-या १५ उमेदवारास (क्रमांक २६ ते ४० वरील आलेले) यांना प्रत्येकी -२.५ गुण

याप्रमाणे गुणांचे भारांकन करण्यात येईल.

६.४ शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ८७.५ % भारांकन व उर्वरित १२.५ % भारांकनाकरीता उक्त परिच्छेद क्रं. ६.३ मधील धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण याची बेरीज करुन उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**उदाहरणार्थ** :- श्री "क" या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता परिक्षा (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा (विज्ञान) मध्ये एकुण निर्धारित ५०० गुणापैकी ३०० गुण प्राप्त केले आहे. त्यांची टक्केवारी ६०% येईल, त्यांचे ८७.५ % भारांकन म्हणजे ५२.५० ऐवढे येईल. तसेच ५ कि.मी / ३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे, तर उर्वरित १२.५% भारांकन करीता ८ गुण मिळतील. याप्रमाणे गुणवत्ता यादी करीता त्यास वरील परिच्छेद क्रं ६.३ मधील सुत्रानुसार त्यांना मिळणारे गुण = ५२.५० + ८ = ६०.५० % अशा प्रकारे गणना केली जाईल.

६.५ उक्त चाचणीमधून पुढील पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांचे ते विहीत शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा व विशेष सुट करिता दावे इ. चे बाबीची पूर्तता करतात किंवा कसे याची शहानिशा करण्यात येईल.

६.६ सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारीरीक पात्रता धारण करतात किंवा कसे, हे निश्चीत करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

६.७ शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट व शारीरीक पात्रता धारण करणारे आणि उपरोक्त प्रथम धावण्याची चाळणी मधून पुढील टप्प्यासाठी पात्र उमेदवारांची शारीरीक क्षमता चाचणी खालीलप्रमाणे घेण्यात येईल.

शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.३० जुलै, २०११ अन्वये **पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. चालणे व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालणे ४ तासात पूर्ण करणे अनिवार्य राहील.** जे उमेदवार सदरची शारीरिक क्षमता ४ तासात पूर्ण करणार नाहीत, असे उमेदवार निवडीस पात्र ठरणार नाहीत, तसेच उक्त चाचणीसाठी वेळापत्रकानुसार विहीत केलेल्या दिनांकास कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित राहणारे उमेदवार निवडीस पात्र ठरणार नाहीत.

६.८ शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट, शारीरिक पात्रता धारण करणारे आणि वरील परिच्छेद ६.७ मधील उल्लेखीत शारीरिक क्षमता चाचणी नंतर पांत्र ठरलेले उमेदवारांची अंतिम निवड सूची तयार करण्यात येईल.

६.९. सदर निवडसूची ३१ डिसेंबर २०१५ पर्यन्त विधीग्राहय ठरेल, त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

६.१० अंतीम निवडसूचीतील उमेदवार नियुक्ती/पदस्थापनेचे आदेशानुसार वनरक्षक पदावर रुजू न झाल्यास किंवा सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र पडताळणी किंवा अन्य कोणतेही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास, अश्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश रदद करुन निवडसूचीतील प्रतिक्षा यादीवरील जेष्ठतेनुसार पुढील उमेदवारास नियुक्तीबाबत संधी देण्यात येईल.

७. सेवाशुल्क :-

उमेदवारांनी ONLINE पध्दतीने अर्जानुसार सेवाशुल्क खालीलप्रमाणे भरणा करावे.

| प्रवर्ग | शुल्क |
|---|---|
| खुला | रु. ५००/-<br>(अक्षरी रु पाचशे) |
| मागावर्गीयां करीता/<br>राखीव प्रवर्ग | रु. २५०/-<br>(अक्षरी रु दोनशे पन्नास) |
| माजी सैनिक | नाही |

ONLINE पध्दतीने प्राप्त केलेली चालान **भारतीय स्टेट बॅकेच्या** च्या कोणत्याही शाखेमध्ये जाऊन भरणा करावी व चालानची प्रत अर्जदाराने जपून ठेवावी. वनविभागाने मागणी केल्यास ती सादर करणे आवश्यक राहील.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती

## ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना

| अ.क्रं | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यन्त |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंद (रजीस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | १६-८-२०१४ | ६-९-२०१४ |
| २ | संगणकीय चालानव्दारे स्टेट बँक ऑफ ईडीया एसबीआय यांचे शाखेमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | १७-८-२०१४ | ८-९-२०१४ |
| ३ | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि ८-९-२०१४ पर्यन्त भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दि. १०-९-२०१४ रात्री २३-५९ वाजेपर्यन्त | |

८. अर्ज करण्याची पध्दत :-

८.१ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना MKCL या संस्थेच्या forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विहीत केलेला नमुना अर्ज सदर संकेत स्थळावर उपलब्ध होईल.उमेदवार त्यांचा अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी एमकेसीएल,पूणे यांच्या अधिकृत केंद्राची मदत व मार्गदर्शन घेवू शकेल. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (ALC- Authorised Learning Center) पत्त्यासह माहिती forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर दिलेल्या दिशा निर्देशानुसार उमेदवारानी अर्ज करावा.

८.२ नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application Form No.) व पासवर्ड (Password) काळजीपूर्वक स्वत:कडे पुढील प्रक्रियेसाठी जपून ठेवावा.

८.३ यानंतर नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने प्रिंट चालान (Print Challan) या बटनावर क्लिक करुन प्रिंट करावे.

८.४ बँक चलानावर नमुद केलेली फी स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे शाखेमध्ये जाहिरातीत दिलेल्या मुदतीचे आंत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील. व त्यांची एक प्रत स्वत:कडे जपून ठेवावी. फी भरण्यासाठी बँकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बँकेत भरावे.

८.५ बँकेत फी भरल्यानंतर उमेदवाराने आपला उर्वरीत अर्ज १ दिवसानंतर भरावा. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवारांने स्वत:चा अद्यावत (Latest)फोटो व स्वत:ची स्वाक्षरी विहीत पध्दतीने स्कॅनरवरुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

८.६ उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट दोन प्रतीत काढून ती स्वत:कडे ठेवावी व त्यापैकी एक प्रत शारीरीक तपासणीचे वेळेस ओळखपत्रासह सादर करावी. आधार कार्ड,पॅनकार्ड,ड्रायव्हींग लायसन्स किंवा वोटर आयडी यापैकी एक पूरावा सोबत आणणे आवश्यक आहे.

वरील सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर उमेदवार पुढील प्रक्रियांसाठी पात्र होईल. उमेदवारांच्या माहिती व मदतीकरीता एमकेसीएल पूणे यांच्या कॉल सेंटर वरील कॉल सेंटर क्रं ९३२६५५२५२५ वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

९. निवड प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १ | कार्यक्षेत्रात असलेल्या सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण अधिकारी कार्यालय/प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी जिल्हाधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/ आदिवासी प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावरुन इच्छुक उमेदवारांना रिक्त पदांची माहिती कळवून पत्र देणे. | दिनांक २६/०८/२०१४ |
| २ | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दिनांक १०/०९/२०१४ |
| ३ | प्राप्त अर्जाची तपासणी पूर्ण करण्याची अंतिम तारीख (परिच्छेद ६.१) | दिनांक १७/०९/२०१४ |
| ४ | प्राप्त अर्जाची छानणी नंतर पात्र उमेदवारांची प्रथम धावण्याची चाचणी कार्यक्रम प्रसिध्द करणे (परिच्छेद ६.२) | दिनांक १९/०९/२०१४ |
| ५ | पात्र उमेदवारांची प्रथम (५ कि.मी/३.कि.मी) धावण्याची चाळणी चाचणी तारीख (परिच्छेद ६.३) | दिनांक २२/०९/२०१४ ते २४/०९/२०१४ |
| ६ | धावण्याची चाचणी नंतर पात्र झालेले उमेदवारांची यादी तसेच प्रमाणपत्र तपासणे व त्यांचे शारीरीक पात्रता तपासणी करणे तारीख (उंची व छातीचे माप ठरवून दिलेल्या मापदंडानुसार तपासणे) (परिच्छेद ६.६) | दिनांक २९/०९/२०१४ ते ३०/०९/२०१४ |
| ७ | प्रमाणपत्र तपासणीनंतर पात्र झालेले उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे तसेच त्यांची शारीरीक क्षमता चाचणी (चार तासात २५ कि मी /१६ कि मी चालणे) तारीख प्रसिध्द करणे (परिच्छेद ६.७) | दिनांक ०१/१०/२०१४ |
| ८ | पात्र उमेदवारांची चार तासात २५ कि मी / १६ कि मी चालण्याची चाचणी (परिच्छेद ६.७) | दिनांक ०८/१०/२०१४ ते १०/१०/२०१४ |
| ९ | अंतिम निवड यादी तयार प्रसिध्द करणे (उमेदवारांची शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांचे ८७.५ % भारांकन + ५ कि मी / ३ कि.मी मध्ये भारांकनानुसार मिळालेले गुणांची बेरीज) (परिच्छेद क्रं. ६.४ व ६.८) | दिनांक १५/१०/२०१४ |

टिप :-

(i) प्रथम धावण्याची चाचणी, शारीरीक पात्रता तपासणी, शारीरीक क्षमता चाचणी ई बाबत तारीख वरील वेळापत्रकाप्रमाणे असुन, स्थळ व वेळ **forest.erecruitment.co.in** संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(ii) तारीख, वेळ व ठिकाण **forest.erecruitment.co.in** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

१०. आरक्षणाबाबत सूचना :-

१०.१ "महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७/८/२००९ अन्वये प्रकल्पगंरतांना असलेले ५ % समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून आरक्षणाअंतर्गत भुकंपग्ररतासाठी ठेवलेले आरक्षण काढून भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ % समांतर आरक्षण लागू राहील"

वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती

१०.२ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८१/१३-अ दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाचा प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा.,अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व, ईएसबीसी, एसबीसी-ए प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार होणा-या राखीव पदाची संख्या पदाच्या तपशिल या शिर्षातंर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येईल.

१०.३ वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र,इमाव, ईएसबीसी व एसबीसी-ए या प्रवर्गातील उमेदवारासाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय, सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६/प्र.क्र.१५/ मावक-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारित नमुण्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) दिनांक ३१/०३/२०१४ पर्यन्त वैध असलेले सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, अर्ज नाकारणे योग्य समजता येईल.

खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति / गटातील (क्रिमीलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

१०.४ महिला आरक्षणा करिता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारानी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०.५ खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू उमेदवारांना खेळाडूसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडुंचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

१०.६ "सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे व त्यांना सध्याच्या ४५ वर्षे मर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करून सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल."

## ११. सर्वसाधारण अटी :-

११.१ सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

११.२ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर विहित केलेल्या पध्दती प्रमाणे अर्ज करावा.

११.३ वनविभागात कार्यरत अधिसंख्य वनमजूरानी वनरक्षक पदाकरीता विहीत पात्रतेनुसार विहित केलेल्या पध्दती प्रमाणे **ऑनलाईन अर्ज सादर करावा.**

वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती

११.४ पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार प्रादेशिक निवड समितीने राखुन ठेवले आहेत.

११.५ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

११.६ उमेदवारांना शारिरीक क्षमताचाचणी परिक्षा व ईतर बाबीकरीता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

११.७ वनविभागातील वनरक्षक या पदावर नियुक्ती करतांना एकूण ५ % पदे होमगार्डस मध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व वनरक्षक पदासाठी आवश्यक शैक्षणिक / शारिरीक पात्रता पुर्ण करणा-या विहीत वयोमर्यादेतील तसेच विहीत पात्रता परिक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डस मधून भरण्यात येतील.

**१२. भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना :-**

१२.१ उमेदवाराने जाहिरात काळजीपर्वूक वाचावी.

१२.२ उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज भरल्यास तो पुढील प्रक्रियांसाठी अपात्र ठरेल.

१२.३ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

१२.४ आरक्षित पदांच्या संदर्भात शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र/बीसीसी/२०११/प्रक्र-१०६४/२०११/१६ब/दिनांक १२-१२-२०११ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आंत सक्षम प्रधीका-याकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन नियुक्ती प्राधीका-याकडे सादर करणे अनिवार्य राहील, अन्यथा दिलेली नियुक्ती रदद करण्यात येईल.

१२.५ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी रदद ठरविली जाईल.

१२.६ निवड झालेल्या उमेदवारांची अमरावती किंवा बुलडाणा जिल्हयातील कोठेही नियुक्ती होऊ शकते.

१२.७ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही व त्या बाबतची कोणत्याही स्वरुपाची नुकसान भरपाई देय राहणार नाही.

१२.८ ONLINE पध्दतीने उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी नमुद केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे निदर्शनास आल्यास, तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल किंवा नियुक्ती दि ल्यानंतर निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रदद करण्यात येईल व त्यानंतर याबाबत उमेदवारांची कोणत्याही प्रकारची तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१२.९ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी नोंद करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.

१२.१० पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत,ऑनलाईन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने अथवा या कार्यालयाचे संकेतस्थळावर पाठवू नये.

१२.११ उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाइन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे.ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रूटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्वीकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

१२.१२ वनरक्षक पदासाठी धावण्याची चाळणी चाचणी ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने चाचणीचे आधारे उमेदवारांना निवडबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. जे उमेदवार उक्त पदाकरीता आवश्यक अर्हता व शारीरिक पात्रता पूर्ण करीत अश्यांचीच सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतीम निवड केली जाईल.

१२.१३ भरतीसंबंधी वेळोवेळी forest.erecruitment.co.in संकेतस्थळावर सुचना जाहीर करण्यात येईल. उमेदवारांनी नियमितपणे संकेतस्थळावर पाहणी करावी.

१२.१४ विहीत वयोमर्यादेतील ईच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज संबंधीत विभागातील सक्षम प्राधीका-याच्या लेखी पूर्वपरवानगीने भरावे.

१२.१५ अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी खेळाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधीका-याचे असावे.

१२.१६ अर्ज एकदा ऑनलाइन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक सर्व तपशील स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

सदस्य सचिव
प्रादेशिक निवड समिती
तथा
उपवनसंरक्षक
अमरावती वनविभाग अमरावती